**नियमित दिवाणी दावा नं.११६/२०१७ मधील**
**<u>निशाणी क्र.१ सह १६ वरील आदेश.</u>**

प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी निशाणी १६ वर प्रतिदावा दाखल करुन ठरावाची मागणी केली आहे. प्रतिदावा हा दाव्यासारखाच चालविता येण्याजोगा असल्याने, सदर प्रतिदाव्याचे कोणतेही मुल्यांकन केलेले नसल्याने व त्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ लागू होत असल्याने प्राथमिक मुद्दे काढयात आले होते.

२. सदर प्रतिवादी यांच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये एप्रिल १९९२ मध्ये तोंडी वाटप झालेले असून पाटणे पांडापूर येथील वाद मिळकत सर्वे क्र. ५८/१ व ग्रामपंचायत कासू घर क्र. ७२३अ सदर प्रतिवादींच्या हिश्श्यास आलेली असून ते ताबेकब्जात आहेत असा ठराव करुन मिळण्यासाठी प्रतिदावा दाखल केलेला आहे. सदर प्रतिदाव्याचे अवलोकन करता प्रतिदाव्याचे कोणतेही मुल्यांकन केलेले नाही.

३. त्याअनुषंगाने खालील प्राथमिक मुद्दे काढण्यात आले आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्याचे कारणेमिमांसा खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | प्राथमिक मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिदाव्याचे मुल्यांकन योग्यप्रकारे केले आहे काय? | नाही |
| २ | प्रतिदाव्यावर योग्य स्टॅम्प भरलेला आहे काय ? | नाही |
| ३ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

४. वादी व प्रतिवादी यांना वारंवार संधी देऊनही प्राथमिक मुद्दयांवर

कोणताही पुरावा देण्यात आला नाही.

५. प्राथमिक मुद्दयाच्या युक्तिवादासाठी प्रतिवादी क्र. २ ते ७ तर्फे कोणीही हजर नाही.

६. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वाद मिळकतींचे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सन १९९२ मध्ये तोंडी वाटप झालेले आहे. तेव्हापासून सदर प्रतिवादी हे पाटणे पांडापूर येथील वाद मिळकत सर्वे क्र. ५८/१ व ग्रामपंचायत कासू घर क्र. ७२३अ सदर प्रतिवादींच्या हिश्श्यास आलेली असून ते ताबेकब्जात आहेत. तसा ठराव करुन मिळणेसाठी सदरचा प्रतिदावा दाखल केला आहे. दि.प्र.सं.आदेश ७ नियम १–आय प्रमाणे प्रतिदावा दाखल करताना प्रतिदावा मिळकतीचे मुल्य व भरण्यात आलेली कोर्ट फी याबाबत उल्लेख असणे गरजेचे आहे. सदर नियमानुसार प्रतिदाव्याची मुल्यांकनाची व त्यावरील कोर्ट फी भरण्याची प्राथमिक जबाबदारी प्रतिदावा करणार्या प्रतिवादी यांची असते. प्रस्तुत प्रतिदाव्यातील प्रतिवादींनी प्रतिदाव्यामध्ये न्यायालयाच्या आदेशाने होणारा कोर्ट फी स्टॅम्प भरण्यास प्रतिवादी तयार असल्याचे सांगितले आहे मात्र स्वतः प्रतिदाव्याचे कोणतेही मुल्यांकन केलेले नाही. प्रतिवादींचे वर्तन स्वतःची प्राथमिक जबाबदारी झटकून न्यायालयाकडून स्वतःचे काम करुन घेण्याबाबतचे असल्याचे स्पष्ट दिसून येते. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे प्रतिदाव्यातील मिळकतींचे मुल्यांकन करुन देणे व त्यानुसार कोर्ट फी भरण्यास सांगणे हे न्यायालयाचे कर्तव्य नाही. दि.प्र.सं.आदेश ७ नियम ११ ब प्रमाणे वादीने केलेले मुल्यांकन चुकीचे असल्यास न्यायालय मुल्यांकन दुरुस्त करुन नियम ११ क प्रमाणे योग्य कोर्ट फी भरणेस मुदत देऊ शकते. सदर कलमाचे काटेकोर

अवलोकन केल्यास दाव्याबाबत मुल्यांकन करण्याची प्राथमिक जबाबदारी वादीची असल्याचे म्हणजेच प्रस्तुत प्रकरणात प्रतिदाव्याबाबत ही जबाबदारी प्रतिवादी क्र. २ ते ७ यांची असल्याचे दिसून येते. मात्र प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी प्रतिदाव्यात कोणतेही मुल्यांकन केलेले नाही. तसेच कोणताही कोर्ट फी स्टॅम्प भरलेला नाही. त्यामुळे मी दि.प्र.सं.आदेश ७ नियम ११ ब व क च्या अनुषंगाने मुद्दा क्रमांक १ व २ या प्राथमिक मुद्दयांबाबत नकारार्थी निरीक्षण नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ३ करीता –**

७. उपरोक्त प्रतिवादीस एक संधी देऊन महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्ट मधील तरतुदीप्रमाणे योग्य मुल्यांकन करुन त्यावर योग्य कोर्ट फी भरण्यास सांगणे गरजेचे आहे. सबब, दिवाणी प्रक्रिया संहीता १९०८ चे आदेश ७ नियम ११(ब व क) अन्वये मी मुद्दा क्रमांक ३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्रमांक २ ते ७ यांनी सदर आदेशापासून ७ दिवसांचे आत निशाणी १६ वरील प्रतिदाव्याचे प्रस्थापित कायदयानुसार योग्य मुल्यांकन करुन त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प भरावा.

२. प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी असे करण्यास कसूर केल्यास प्रतिदावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ ब व क प्रमाणे नाकारण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DESHPANDE PRITESH CHANDRASHEKHAR
Date: 2022.04.20 16:51:22 +0530

**पेण.** **( प्रितेश देशपांडे )**
**दिः १९.०४.२०२२.** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पेण.**